पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ७४**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०१/०८/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०१/०८/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा.लोंढे नम्रता योगेश
९. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१०. मा.गीता सुशिल मंचरकर
११. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१२. मा.लांडगे सारिका संतोष
१३. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५. मा.बारणे अर्चना तानाजी

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.झगडे, मा.खोराटे,

मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.खोत, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.पाटील, मा.घुबे, मा.सुपेकर - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट, मा.आगळे – प्रशा.अधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.१३) भक्ती शक्ती चौक येथे ग्रेड सेप्रेटर व उड्डाणपुल बांधणे (विद्युत विषयक कामे) (२०१७-१८)

विषय क्र.१४) आदिवासी सांस्कृतिक महोत्सव आयोजित करणेबाबत – मा.सागर आंगोळकर, मा. राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव

----------

दिनांक २५/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७३)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ३००२ विषय क्रमांक - ०१

दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – शिक्षण मंडळ कार्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.शिमं/९/कावि/१२८/२०१८ दि.१७/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये केयान मशिन देखभाल दुरुस्ती व इ.१ ली ते ७ वी चा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा सुचना क्र.२/२०१८-१९ व २०१९-२०२० अन्वये मे.ग्लोबल एज्युकेशन ॲन्ड टेक्नॉलॉजी सोल्युशन्स यांचे प्रति मशिन र.रु.५९,९००/- असे असून यानुसार मनपा प्राथमिक शाळांमध्ये एकूण ८८ केयान मशिन साठी २०१८-१९ व २०१९-२०२० र.रु.१,०५,४२,४००/- (अक्षरी र.रू.एक कोटी पाच लाख बेचाळीस हजार चारशे फक्त) इतक्या होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३००३ विषय क्रमांक - ०२
दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/६/कावि/५१/२०१८ दि.१८/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.२६/१/२०१७-१८ अन्वये सन २०१७-१८ करिता जलक्षेत्र क्र.ड/१५ मध्ये पिंपरी येथील जमतानी चौक ते अशोक थिएटर जवळील पाण्याच्या टाकीपर्यंत ४५० मी.मी व्यासाची नवीन गुरुत्व नलिका टाकणे व जुनी गुरुत्व नलिका बंद करणेकामी मे.शुभम उद्योग निविदा रक्कम रू.५६,०२,२४०/-(अक्षरी र.रू.छप्पन लाख दोन हजार दोनशे चाळीस फक्त) पेक्षा २.२५% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५४,७६,१८९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३००४ विषय क्रमांक - ०३
दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/६/कावि/३१२/२०१८ दि.१९/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे विद्युत विभागासाठी विविध ट्युबलर व ऑक्टोगोनल पोल साहित्य खरेदीकामी ई निविदा सुचना क्र.54/6/2016-17 अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. यानुसार सदर निविदे करीता एकुण पाच निविदाकार प्राप्त झाले. त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.ब्राईटशाईन असोसिएटस यांचे निविदेतील बाब क्र.2 या साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.45,34,250/- व बाब क्र.3 या साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.23,03,250/- प्रमाणे एकुण 02 बाबी साहित्याचे एकुण लघुत्तम दर र.रू.68,37,500/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.37% ने जास्त असले तरी सन 2017-18 चे सार्वजनिक बांधकाम (PWD) कडील डी.एस.आर DSR पेक्षा बाब क्र.2 चा दर -16.06 % ने कमी तर बाब क्र.3 चा दर -21.71% ने कमी असल्याने स्विकृत करून त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३००५
विषय क्रमांक - ०४

दिनांक – ०१/०८/२०१८
विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी
अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अमुका/३/कावि/३३०/२०१८ दि.२९/०६/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार घरोघरचा कचरा गोळा करुन मोशी कचराडेपो येथे वाहतुक करुन टाकणेकामी ब व क प्रभाग कार्यक्षेत्रातील या कामासाठी निविदा नोटिस क्र.५/२०११-१२ देशपातळीवर प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आलेली होती. मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांची प्राप्त कमी दराची निविदा प्रती टन र.रु.७१४/- स्विकृत करुन मा.स्थायी समिती ठराव क्र.१५४९३ दि.२५/१०/२०११ व क्रमांक १६४२१ दि.२०/१२/२०११ अन्वये प्रथम वर्षासाठी प्रती टन र.रु.७१४/- व त्यापुढील प्रत्येक वर्षासाठी ५% दर वाढीस मान्यता देणेत आलेली आहे. त्यांनी दि.२९/१२/२०११ रोजी करारनामा सादर केलेला आहे. त्यानुसार ५ वर्षे कामाचा आदेश क्र.आमुका/३/कावि/०७/२०१२ दि.०२/०१/२०१२ अन्वये देणेत आलेला आहे. तसेच ब, क, इ व ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रायमरी व सेकंडरी कलेक्शन आणि अ, फ व ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत कचरा उचलणे व मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतूक करणेचे (सेकंडरी कलेक्शन) काम देण्यात आले आहे. सदर कामाची मुदत दि.०२/०१/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे. तद्नंतर या कामासाठी वेळोवेळी मुदतवाढ देवून कामकाज सुरु आहे. अ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्र. १४ व १७ मध्ये ३ टिपर वाहने व प्रभाग क्र. १८ व १९ मध्ये २ कॉम्पॅक्टर वाहने घरोघरचा कचरा गोळा करणे व वाहतूक करणे (प्रायमरी व सेकंडरी) कामकाज मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा. लि. यांचेमार्फत करणेत येत असल्याने त्यांना प्रति मे.टन र.रु.९११/- प्रमाणे बिल अदायगी करण्यास मान्यता मिळालेली आहे. याबाबात कामाचा आदेश क्रं.आमुका/३/कावि/३५७/२०१७, दि.०३/०१/२०१७ देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.३१/१०/२०१७ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा.स्थायी समिती ठराव क्रं.१२८५, दि.१५/११/२०१७ अन्वये दि.०१/११/२०१७ ते दि.३१/०१/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता मिळालेली आहे. या मुदतवाढ कामाचा आदेश क्रं.आमुका/३/कावि/४९२/२०१७, दि.२९/१२/२०१७ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदत दि.३१/०१/२०१८ रोजी संपुष्टात आल्यानंतर मा.स्थायी समिती ठराव क्रं.२३४३ दि.२८/०२/२०१८ अन्वये दि.०१/०२/२०१८ ते दि.३१/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता मिळालेली आहे. या मुदतवाढ कामाचा आदेश क्रं.आमुका/३/कावि/१९२/२०१७, दि.१६/०३/२०१८ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदतवाढ दि.३१/०३/२०१८ अखेर संपुष्टात आल्यानंतर मा.स्थायी समिती ठराव क्रं.२५१५, दि.११/०४/२०१८ अन्वये दि.०१/०४/२०१८ ते दि.३०/०६/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.२६४३ दि.०९/०५/२०१८ अन्वये प्रायमरी व

सेकंडरी वेस्ट कलेक्शनसाठी प्रति टन दर र.रु.९११/- मध्ये ५% दर वाढ देवून र.रु.९५६.५५ या दराने दि.०१/०५/२०१८ पासून बिल अदा करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार या मुदतवाढ कामाचा आदेश क्रं.आमुका/३/कावि/२७७/२०१७, दि.२१/०५/२०१८ अन्वये देणेत आलेला आहे. सदर कामाची मुदतवाढ दि.३०/०६/२०१८ अखेर संपुष्टात येत आहे. सदर कामाची मुदतवाढ दि.३०/०६/२०१८ अखेर संपुष्टात येत आहे. या कामाची नविन निविदा रद्द झालेने निविदेचे काम पुर्ण होणेसाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे वर नमूद केलेल्या कामासाठी मे. बी.व्ही.जी.क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. यांना दिनांक ०१/०७/२०१८ ते दिनांक ३१/१२/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होऊन नवीन संस्थांना कामकाज आदेश देई पर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च र.रु.६,७८,०३,४५८/- (अक्षरी र.रु.सहा कोटी अठ्याहत्तर लाख तीन हजार चारशे अठ्ठावन्न फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील कामास दि.०१/७/२०१८ ते ३०/९/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३००६ विषय क्रमांक - ०५

दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – क्रिडा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त, क्रिडा यांचे जा.क्र.क्रिडा/४/कावि/२४३/२०१८ दि.२३/०७/२०१८

मा.सहा.आयुक्त, क्रिडा यांनी शिफारस केले प्रमाणे –

दि.१५/१/२०१३ रोजी दुर्गादेवी टेकडी उद्यान, निगडी, पुणे ४४ येथे चित्रकला स्पर्धेकरिता म.न.पा.परिसरातील १० क्रीडा केंद्र अंतर्गत विद्यार्थ्यांची ने आण करणेकामी एकूण १० पी.एम.पी.एम.एल. बस व्यवस्थाकामी अंदाजे खर्च र.रु.१,००,०००/- इतका गृहीत धरला होता. त्याकामी एकूण बस भाडे र.रु.१,२१,०९७/- इतका प्रत्यक्ष खर्च आला असून, अंदाजापेक्षा र.रु.२१,०९७/- इतका खर्च जादा झाल्याने, सदरचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३००७ विषय क्रमांक - ०६

दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – स्थापत्य बीआरटीएस

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/बीआरटीएस/५५२/२०१८ दि.२३/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतातील १०० शहरे स्मार्ट सिटी म्हणुन विकसित करणे मोहीमे अतंर्गत केंद्र शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी शहराच्या यादी मध्ये समावेश केलेला आहे. या करीता पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी कं.लि. या विशेष उद्देश वहन सस्थेंची स्थापना करणेत आलेली आहे. सदर प्रकल्पा अंतर्गत Area Based Development/ क्षेत्रिय पायभुत सुविधा या तत्वावर शहर विकसित करणेत येणार आहे. त्यानुषंगाने पिंपळे गुरव व पिंपळे सौदागर या परिसरामध्ये Area Based Development/ क्षेत्रिय पायाभुत सुविधा या अतंर्गत सार्वजनिक सायकल व्यवस्था ही सुविधा नागरिकांना देणेकामी मा.आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी कं.लि. यांचे समवेत त्यांचे दालनामध्ये दि.०३/०७/२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने खालील मुद्ये अंतिम करणेत आलेले आहे.

1. पुणे महानगरपालिकेने राबविलेल्या सार्वजनिक सायकल सुविधा योजनेच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सार्वजनिक सायकल सुविधा योजना राबवावी.
2. सार्वजनिक सायकल सुविधा योजना पुर्णत:प्रायोजक तत्वावर राबवावी परंतु या करीता आवश्यक पायभुत सुविधा पिंपरी चिंचवड मनपा मार्फत पुरविण्यात याव्यात.
3. सार्वजनिक सायकल सुविधा योजनेचे प्रायोजक त्यांचे स्वखर्चाने सायकल पुरवतील, देखभाल दुरुस्ती करतील, परंतु दिशादर्शक फलक, स्टेशन उभारणे, रस्त्यावरील पट्टे रंगविणे इ. साठीचा खर्च स्मार्ट सिटी कंपनीच्या निधीमधुन पिंपरी चिंचवड मनपामार्फत करणेत येईल.
4. सार्वजनिक सायकल सुविधा योजना अंतर्गत निर्धारीत केलेल्या ठिकाणांवर सायकल पुरविणे ही पुर्णत:प्रायोजकाची जबाबदारी राहील. रात्रीचे वेळी सायकल चालकाने इस्तत:सोडुन देणेत आलेल्या सायकली गोळा करणे, प्रायोजकाची जबाबदारी राहील.
5. सार्वजनिक सायकल सुविधा योजनेअंतर्गत सायकल वापरासाठीचे दर आकारणेचे अधिकार संपुर्णतः प्रायोजकाची जबाबदारी राहील.

6. या योजने अंतर्गत ज्या खाजगी सायकल प्रायोजक कंपन्या येतील व ज्यांना या क्षेत्रामध्ये व्यवसाय करणेची इच्छा आहे. तसेच ज्यांना मनपाच्या अटी शर्ती मान्य असतील त्यांना सायकल सुविधा योजनमध्ये सहभागासाठी मान्यता देणेत येईल.
7. सायकल सुविधा योजनेसाठीची परवानगी संबंधित प्रायोजक कंपनीला ५ वर्षासाठी देणेत येईल.
8. सायकल सुविधा योजनेच्या सेवेबाबत नागरिकांच्या तक्रारी निवारण करणेची जबाबदारी पुर्णतः प्रायोजक कंपनीची राहील.
9. सायकल सुविधा योजने अंतर्गत सायकल फेरीच्या दरामध्ये वाढ/घट करणेचे संपुर्ण अधिकार प्रायोजक कंपनीकडे असतील.
10. प्रायोजक कंपन्यांना सायकलचा वापर, वेळ, जमा होणारा महसुल याचा अहवाल दर महिन्याचे ५ तारखेपर्यंत विहीत नमुन्यामध्ये पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी कं.लि. कडे सादर करणे बंधनकारक राहील.
11. मनपाचे उर्वरीत परिसरामध्ये यापेक्षा जादा प्रायोजक कंपन्या आल्या व त्यांना या क्षेत्रात सुविधा पुरविणेची इच्छा असेल त्यांना परवानगी देणेचे अधिकार मा.आयुक्त, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी कं.लि. यांना असतील.
12. पिंपरी मनपा व पिं.चिं.स्मार्ट सिटी कं.लि. कोणत्याही प्रकारे अर्थिक गुंतवणुक करणार नाही.
13. सार्वजनिक सायकल सुविधा योजनेमध्ये अत्याधुनिक सुविधा असलेल्या सायकली व उच्च दर्जाची सेवा, समर्पित (Dedicated)अँप, अत्याधुनिक तांत्रिक सोयी प्रायोजकाने करावयाच्या आहेत.
14. सार्वजनिक सायकल सुविधेचा वापर करण्या-या सायकल स्वाराला अपघात झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी प्रायोजकाची राहील. त्यास पिंपरी चिंचवड मनपा अथवा पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी कं.लि. जबाबदार राहणार नाही.
15. पहिल्या टप्पयामध्ये सार्वजनिक सायकल सुविधा योजना ही पिंपळे सौदागर ते वाकड या बीआरटीएस कॉरीडॉर वरील व Area Based Development परिसरातील सुमारे ४५ ठिकाणी राबविणेत यावी व जसा प्रतिसाद मिळेल त्याप्रमाणे शहरामध्ये इतर ठिकाणी विस्तारीकरण करणेत येईल.

तरी खाजगी क्षेत्रातुन सार्वजनिक सायकल सुविधा/Public bicycle sharing (PBS) ही संकल्पना राबविणेसाठी मा.आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी कं.लि. यांनी मान्यता दिलेल्या उक्त मुद्यांच्या अनुषगांने सार्वजनिक सायकल व्यवस्था योजना

पहिल्या टप्प्यामध्ये पिंपळे सौदागर, वाकड या रस्त्यावरील व Area Based Development मधील सुमारे ४५ ठिकाणी लागु करणेस सायकल प्रायोजक कंपन्याना मान्यता देणेस हरकत वाटत नाही. तसेच पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी कं.लि. व सायकल सुविधा योजना प्रायोजक कंपनी यांमध्ये करावयाचे सामंजस्य करारनामा/ Memorandum of Understanding (MoU) मसुदा यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३००८ विषय क्रमांक - ०७

दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मातंवि/३/कावि/६८/२०१८ दि.२६/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी Virtual Assistant Implementation प्रणाली राबविणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियममधील अनुसूची प्रकरण-५(२)(२) नुसार मे.ORIOLE लि. यांचेकडून थेट पद्धतीने करारनामा करुन प्रथमत: करसंकलन विभागासाठी तांत्रिक प्रणाली उपलब्ध करुन २५ इंग्रजी व २५ मराठी प्रश्न-उत्तरे तयार करुन प्रायोगिक तत्वावर प्रकल्प राबवून ३ महिने कालावधीत संगणक प्रणाली उपलब्ध करुन देणे व पुढील ९ महिने कालावधीकरीता संगणक प्रणालीची देखभाल दुरुस्ती करणेकामी येणा-या एकत्रित र.रु.६,५२,५५४/- (अक्षरी र.रु.सहा लाख बावन्न हजार पाचशे चोपन्न फक्त) अधिक जी.एस.टी. इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३००९ विषय क्रमांक - ०८

दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/६/कावि/८६१४/२०१८ दि.२६/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या माध्यमिक विद्यालयातील १० वी शालांत परिक्षेत ८० टक्के पेक्षा जादा गुण संपादन करणा-या गुणवंत विद्यार्थ्यांना व अंध व अपंग विद्यार्थ्यांना बक्षीसे देणेकामी सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात र.रु.५०,००,०००/- अंदाजपत्रकीय तरतूद केलेली आहे. तथापि सदर तरतुदी मधुन अद्याप पर्यंत काहीही रक्कम खर्च पडलेली नाही. परंतु वरील कार्यक्रमासाठी अंदाजे खर्च ५९,४०,०००/- खर्च अपेक्षित असल्याने व भविष्यात काही रक्कम खर्च करावयाची

असल्यास सदर लेखा शिर्षावर र.रू.१५,००,०००/- वाढीव तरतुद आवश्यक आहे. यास्तव माध्यमिक विभागाकडे सन २०१८-१९ करिता असणा-या "विविध उपक्रम" या लेखाशिर्षावर असणारे र.रू.५,००,००,०००/- तरतुदी मधुन "गुणवंत विदयार्थी सत्कार" या लेखाशिर्षावर र.रू.१५,००,०००/- तरतुद वर्ग करणेबाबत अति.आयुक्त यांचा प्रस्ताव आहे. तरी वरीलप्रमाणे अति.आयुक्त, माध्यमिक शिक्षण समितीयांनी प्रस्तावित केलेनुसार माध्यमिक शिक्षण विभागाचे सन २०१८-१९ चे महसुली खर्च अंदाजपत्रकातील "विविध उपक्रम" लेखाशिर्षावरील रक्कम रुपये १५,००,०००/- इतकी तरतुद 'गुणवंत विदयार्थी सत्कार' या लेखाशिर्षावर वर्ग करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसुची ड मधील प्रकरण ७ तरतुद क्र (२) (ब) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०१० विषय क्रमांक - ०९

दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/६/कावि/१२४/२०१८ दि.२५/०७/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०९/०७/२०१८ ते दि.१५/०७/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१२४/२०१८ दि.२५/०७/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०११ विषय क्रमांक - १०

दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/६/कावि/७५/२०१८ दि.२७/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पाणीपुरवठा विभागाकडील ई-निविदा क्र.२/१/२०१८-१९ अन्वये जलशुद्धीकरण केंद्र से.२३ करीता १६४१ मे.टन द्रवरूप पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड खरेदीकामी वृत्तपत्र तसेच मनपा वेबसाईटवर निविदा नोटीस प्रसिद्ध करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा अटी व शर्तीनुसार पात्र असलेल्या ०३ निविदा दि.२५/०६/२०१८ रोजी निविदा समितीपुढे उघडल्या असून दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

-----------------------------------------------------------------------------

| ठेकेदार | प्राप्त निविदा दर रू. |
|---|---|
| • मे.एस. व्ही. एस. केमिकल कॉर्पोरेशन | ११,१००/-प्र.मे.टन<br>(सुधारित दर र.रु.११,०००/- प्र.मे.टन)<br>(निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ३.७२% ने कमी) |
| • मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. | ११,२१५/- प्र.मे.टन<br>(सुधारित दर र.रु. ११,०००/- प्र.मे.टन) |
| • मे.जी एस. कमर्शिअल कॉर्पोरेशन | १२,४००/-प्र.मे.टन |

-----------------------------------------------------------------------------

वरीलपैकी मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांची र.रू.११,०००/- प्र.मे.टन दराची निविदा लघुत्तम निविदा आहे. जलशुद्धीकरणाचे प्रक्रियेमध्ये द्रवरूप पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड हा घटक अत्यंत महत्वाचा असून त्याचा पुरवठा न चुकता अखंडीतपणे जलशुद्धीकरण केंद्रास होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्याचा शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होवू शकतो. यासाठी सदर पुरवठ्याकामी एकावेळी २ एजन्सीज मनपाचे हाताशी असने गरजेचे असलेने सदर निविदेतील शर्त क्र.१२ नुसार सदरची खरेदी 60:40 या प्रमाणात म्हणजेच 1st Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या 60 % व 2nd Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या 40 % परिमाण 1st Lowest ठेकेदाराच्या दराने खरेदी करावयाचे आहे. तरी, 1st Lowest ठेकेदार मे.एस. व्ही. एस. केमिकल कॉर्पोरेशन यांचेकडून एकूण परिमाणाच्या ६० % परिमाण म्हणजेच ९८५ मे.टन द्रवरूप पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड र.रु.११,०००/- प्र.मे.टन दराने (एकूण खर्च र.रू.१,०८,३५,०००/-) दराने खरेदी करणेस व उर्वरित ४०% परिमाण पुरवठा करणेसाठी निविदा शर्त क्र.१२ नुसार 2nd Lowest ठेकेदार मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांना आपण 1st Lowest ठेकेदाराच्या दराने म्हणजेच र.रु.११,०००/- प्र.मे.टन दराने पुरवठा करणेस तयार आहात का? याबाबत पत्राद्वारे विचारणा केली असता त्यांनी दि.२३/०७/२०१८ चे पत्रान्वये सुधारित र.रु.११,०००/- प्र.मे.टन दराने द्रवरूप पॉली ॲल्युमिनियम क्लोराईडचा पुरवठा करणेस तयार असलेबाबत कळविलेले आहे. तरी, मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांचेकडून उर्वरित ४०% परिमाण म्हणजेच ६५६ मे.टन द्रवरूप पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड, 1st Lowest ठेकेदाराच्या सुधारित दराने म्हणजेच र.रू.११,०००/- प्र.मे.टन प्रमाणे खरेदी करणेसाठी त्यांच्याशी करारनामा करणेस व याकामी येणारा एकूण खर्च र.रू.७२,१६,०००/- (अक्षरी र.रू.बाहत्तर लाख सोळा हजार फक्त) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०१२ विषय क्रमांक - ११
दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे जा.क्र.मातंवि/१२/कावि/९४/२०१८ दि.२७/०७/२०१८

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

निविदा सूचना क्रमांक ५/२०१८-१९ नुसार लघुत्तम निविदाधारक मे.टेक नाईन सर्व्हिसेस यांना महापालिकेच्या करसंकलन विभागाकडील मिळकतकर संगणक प्रणाली दुरूस्ती व देखभाल करणे व प्रणाली अद्ययावत ठेवणेचे कामकाज एक वर्ष कालावधी करीता देण्यास तसेच त्यांचे सोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणारा खर्च र.रू.१२,२८,०००/- (अक्षरी र.रू. बारा लाख अठ्ठावीस हजार फक्त) (अधिक प्रत्यक्ष कर) अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.७५% ने कमी चे दरास व त्या अनुशंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०१३ विषय क्रमांक - १२
दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/८६६/२०१८ दि.२७/०७/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक - ३०१४ विषय क्रमांक - १३
दिनांक – ०१/०८/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे जा.क्र.विमुका/५/कावि/२८४/२०१८ दि.०१/०८/२०१८

मा. अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.1/1/2018-19 अन्वये भक्ती शक्ती चौक येथे ग्रेड सेप्रेटर व उड्डाण पुल बांधणेकामी (विद्युत विषयक कामे)(2017-18) मे.यश इलेक्ट्रो लाईन

नि.र.रू.3,14,75,812/- (अक्षरी र.रु.तीन कोटी चौदा लाख पंच्यात्तर हजार आठशे बारा फक्त) पेक्षा 15.07% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.2,67,32,407/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३०१५ विषय क्रमांक - १४

दिनांक – ०१/०८/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

दरवर्षी प्रमाणे महानगरपालिकेमार्फत आदिवासी सांस्कृतिक महोत्सव आयोजित करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/९५६/२०१८
दिनांक - ०३/०८/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.